**प्रेसनोट दिनांक १८/०६/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे**

**बुधवार पेठ, पुणे येथे कोंबिंग ऑपरेशन करुन २१ पिडीत मुलींची सुटका**

बुधवार पेठेतील रेड लाईट भागात काही घरात मुलींस मर्जी विरोधात डांबुन ठेऊन बळजबरीने वेश्याव्यवसाय करवुन घेतात अशी गुप्त बातमी प्राप्त करुन, मा.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ –१ यांनी बुधवार पेठ भागातील बाटागल्ली येथील वेश्या वस्तीमध्ये कोबिंग ऑपरेशनचे आयोजन केले. सदर कारवाई करीता पोलीस मुख्यालयाकडील १५ पोलीस कर्मचारी व फरासखाना पोलीस स्टेशन कडील ५ पोलीस अधिकारी व २० पोलीस कर्मचारी यांच्या मदतीने बुधवार पेठेत दि. १६/०६/२०१९ रोजी ०५.०० वा. ते ०६.०० वा.चे दरम्यान बुधवार पेठेतील रेड लाईट भागात कोंबीग ऑपरेशन करण्यात आले. त्या मध्ये बाटा गल्ली येथील परिसर पिंजुन काढण्यात आला. ज्या घरात घर मालक व मॅनेजर हे मुलींना बळजबरीने घरात ठेवुन वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडत होते व मुलींकडुन मिळणा-या उत्पान्नातील काही भाग ते ठेवुन घेत होत्या अशा खालील एकुण ०३ कुंटणखाना चालक यांचे विरोधात फरासखाना पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२१७/२०१९,भा.द.वी. कलम ३४४, ३६६(ब), ३४ पिटा ३,४,५,६,७ गुन्हा दाखल केला आहे.

१) एक महिला, वय ४५ वर्षे रा. घर नं. ३९५, चंद्रमती निवास, बाटा गल्ली, बुधवार पेठ

२) एक महिला, वय ४५ वर्षे रा. घर नं. ३९५, आई दादा बिल्डींग, बाटा गल्ली, बुधवार पेठ पुणे

३) एक महिला, रा. साईतारा बिल्डींग, तळमजला, बाटा गल्ली, बुधवार पेठ, पुणे

सदर ठिकाणी एकुण २१ मुलीं मिळुन आल्या. सदर पिडीत मुलींकडे चौकशी केली असता, वरील घरमालक मालकींणीना मुलींच्या मर्जी विरोधात देहविक्रीचा व्यवसाय करुन घेतात व त्यातुन मिळणाया पैशाचा ५० टक्के भाग घर मालक स्वतः घेत असे सांगितले. त्यानंतर सदर २१ पिडीत मुलींना मा. न्यायालयात हजर केले असता, मा. न्यायालयाने त्यांना रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे पाठविणेबाबत आदेश केले आहे. मा. न्यायालयाने केलेल्या आदेशावरुन सदर पिडीत मुलींना रेस्क्यु फाऊंडेशन, हडपसर, पुणे येथे संरक्षणकामी पाठविण्यात आले आहे.

सदर कारवाई मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १, पुणे शहर, मा. प्रदीप आफळे, सहाय्यक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग, पुणे शहर व किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. त्यामध्ये ५ पोलीस अधिकारी व २५ पुरुष व महिला पोलीस कर्मचारी सहभागी होते.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे